दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष ६ वे || अंक १३१ || शनिवार, ०९ मे २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने पाली तहसील कार्यालयात आढावा बैठक संपन्न

## आपत्कालीन व्यवस्थेसाठी प्रशासन सज्जः निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादवः दिनांक ५/५/२०२६ रोजी मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने मा. श्री उत्तम कुंभार. तहसीलदार पाली -सुधागड यांच्या अध्यक्षतेखाली पाली तहसील कार्यालयात सुधागड तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय प्रमुखांची बैठक संपन्न झाली.ङ्ग सदर बैठकीत मा.ङ्ग तहसीलदार सुधागड यांनी सन२०२६च्या मान्सून पूर्व तयारी अंतर्गत तालुक्यातील दरडप्रवण, पूरक प्रवण, तलावे, धबधबे, सडके विद्युत लाईट पोल, शॉक सर्किट होऊ नये,धोकादायक इमारती, नदीला पूरयेणे,पाण्याखाली जाणारे पुल अशा ठिकाणी करावयाच्या उपाययोजनाबाबत सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये सर्व विभाग प्रमुखांना आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, नियंत्रण कक्ष स्थापन करणे, अधिकारी व कर्मचारी यांची मोबाईल नंबर सह अद्यावत माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने सर्व विभागाला त्यांचे कार्यालयातील नोडल अधिकारी यांची नेमणूक करून त्यांची माहिती तालुका नियंत्रण कक्षात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच विभाग प्रमुखांनी विनापरवानगी मुख्यालय सोडू नये. भ्रमणध्वनी कायम सुरू ठेवण्याच्या व तालुक्यात उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देण्याचे निर्देश तहसीलदारांकडून देण्यात आले आहेत. नैसर्गिक आपत्ती सन २०२६-- २०२७ च्या अनुषंगाने तहसीलदार कार्यालय सुधागड येथे दिनांक १/६/२६ रोजी पासून २४७ तास तालुका नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येणार आहे अशा सूचना देण्यात आल्या. निष्ककाळजी मला सहन केला जाणार नाही. या आढावा बैठकीला उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांना तहसीलदार कुंभार साहेब यांनी नोटीस बजावण्याची आदेश दिले. नागरिकांच्या




सुरक्षेला सर्व परी प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. जीवित हानी व वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन सुरू केले आहे सर्व विभागांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले.सदर बैठकीस पोलीस निरीक्षक पाली हेमलता शेरेकर, निवासीनायब तहसीलदार भारत फुल पगारे सुधागड, कृषी ता.अधिकारी श्रीमती दयावंती कदम, सहाय्यक अभियंता पाटबंधारे विभाग कोलाड जीवन माने, नगरपंचायत कार्यालय पाली अधीक्षक सोनल शिंदे, कनिष्ठ अभियंता नगरपंचायत अमोल बायकर, कनिष्ठ अभियंता सा. बा.विभाग सुधागड श्री विक्रांत वाकळे, एम.एस. ई.बी. सहाय्यक अधिकारी सुधागड श्री बी.पी. चात्रे, उप स.अधिकारी बी.एन. कडेल, आरोग्य पर्यवेक्षक पंचायत समिती सुधागड धनंजय पाटील, कनिष्ठ सहाय्यक शिक्षण पंचायत समिती पाली नरहरी भुसाळे, सामाजिक वनीकरण सुधागड प्रतिनिधी सुहास रणवीर, आरोग्य सहाय्यक पंचायत समिती सुधागड सुनील गायकवाड, सुधागड तालुका पशुधन विकासअधिकारी सुयोग म्हसकर, विस्तार अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प सुधागड प्रीती डूणूग, सहाय्यक दुय्यम निबंधक सुधागड सायली धनावडे, मंडळ अधिकारी जाभूलपाडा आ. र. बी. भादि कर, मंडळ अधिकारी पेडली अंकुश साळवे, पत्रकार मंगेश यादव, शरद निकुंभ, गौस खान पठाण यांनी

## हद्दवाढीतील गावांना आता सातबाऱ्याऐवजी प्रॉपर्टी कार्ड; राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी): राज्यातील महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या हद्दवाढीत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये आता पारंपरिक सातबारा उताऱ्याऐवजी प्रॉपर्टी कार्ड देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकार घेण्याच्या तयारीत आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशांनंतर महसूल विभागाने या प्रक्रियेला गती दिली आहे.ङ्गङ्गया निर्णयामुळे शहरी भागात समाविष्ट झालेल्या गावांतील मालमत्ता व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुलभ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रॉपर्टी कार्डमुळे मालमत्तेची अधिकृत नोंद, मालकी हक्क, क्षेत्रफळ आणि इतर माहिती एकाच दस्तऐवजात उपलब्ध होणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.ङ्गतसेच बँक कर्ज मंजुरी, मालमत्ता खरेदी-विक्री, वारसा हक्क आणि कायदेशीर पडताळणी यांसारख्या प्रक्रियांमध्येही वेग येणार आहे. अनेक ठिकाणी सातबारा आणि शहरी नोंदींमधील विसंगतीमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. आता प्रॉपर्टी कार्ड प्रणाली लागू झाल्यास या समस्यांमध्ये मोठी घट होण्याची शक्यता आहे.ङ्गमहसूल विभागाकडून लवकरच यासंदर्भातील अधिकृत धोरण जाहीर होण्याची अपेक्षा असून, राज्यातील हजारो नागरिकांवर




या निर्णयाचा थेट परिणाम होणार आहे.

## ए.जी.ची रिद्धीमा सुदेशकुमार चव्हाण १०० टक्के गुण मिळवून दापोली तालुक्यात प्रथम

दापोली :-दापोली शिक्षण संस्था संचालित ए.जी. हायस्कूलची कुमारी रिद्धीमा सुदेशकुमार चव्हाण हिने नुकत्याच लागलेल्या एसएससी परीक्षेत दापोली तालुक्यात १०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त करून यशाची परंपरा कायम राखली आहे.ङ्ग विद्यालयतून एकूण २६२ विद्यार्थी परीक्षेत बसले होते पैकी २५५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा निकाल ९७.३२% इतका लागला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक रिद्धीमा सुदेशकुमार चव्हाण १०० टक्के, द्वितीय क्रमांक नील उदय फडके ९६.२० टक्के, तृतीय क्रमांक क्रांति विरेंद्र केळस्कर ९५.४० टक्के, चौथा क्रमांक पल्लवी विजय भुवड ९४.८० टक्के तर पाचवा क्रमांक सई आशिष शिगवण ९४.६० टक्के गुण मिळवून विद्यालयामध्ये अनुक्रमे क्रमांक प्राप्त केले



आहेत. तर ८०% च्या वरती तब्बल ४८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. ङ्ग सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रसाद करमरकर, कार्यवाह डॉ. विनोद जोशी, सर्व संचालक मंडळ, शालेय समिती चेअरमन श्री. रवींद्र कालेकर, सदस्य श्रीकांत निजामपूरकर, सदस्या सौ.स्मिता सुर्वे,मुख्याध्यापक एस.एम. कांबळे, उपमुख्याध्यापक श्री. अर्जुन घुले, पर्यवेक्षक श्री. अनिल पेठकर, श्री. मगदूम एस.आय. सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग यांनी विशेष कौतुक केले आहे.

## नागोठणे विभागातील काही विद्यालयांची १०० टक्के निकालाची परंपरा कायम ; भाएसो, हॉली एंजल्स, रिलायन्स स्कूलचा समावेश!

सहसंपादक -: नारायण म्हात्रे ङ्ग फेब्रुवारी व मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता १० वी परिक्षेचा निकाल शुक्रवार ०८ मे रोजी जाहीर झाला असून नागोठणे विभागातील विविध शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू विद्यालयाचा विद्यार्थी फैज नझीर अधिकारी याने ९२.४० टक्के गुण मिळवत परिसरात प्रथम क्रमांक पटकावला. कोकण एज्युकेशन सोसायटीच्या गु. रा. अग्रवाल विद्यामंदिराचा निकाल ९२ टक्के लागला असून १४२ विद्यार्थ्यांपैकी १३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले यामध्ये प्रांजली चौलकर ९१.६० टक्के, प्रथम महाडीक ९०.२० आणि वैदेही म्हात्रे यांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. भाएसोचे एस. डी. परमार स्कुलचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आर्यन चितळे ८२.४० टक्के, ज्योझी पानसरे ८२.२० टक्के, इजान सय्यद ८०.८० टक्के गुण मिळविले. हॉली एंजल्स स्कुलचा निकाल १०० टक्के लागला असून ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. हर्षदा शिरसे ९० टक्के, सिध्दी भोईर ८९.८० टक्के, शाल्मली जवके ८८.२० टक्के गुण मिळवून आपली परंपरा कायम राखली आहे. रिलायन्स स्कूलचा निकालही १०० टक्के लागला असून ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले स्वरा कुथे ८९.४०%, सानिका पाटील ८७.६०%, कृपा गोळे ८७.२०% हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या सर्व विद्यार्थ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवले आहे.ङ्ग या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संबंधित संस्थाचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## गुहागरची सुकन्या समृद्धी सुरेश आंबेकर चमकली शिक्षण क्षेत्राच्या क्षितिजावर : १०वी बोर्डाच्या परीक्षेत मिळवले ९९.२०%गुण

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील वाघांबे गावची सुकन्या आणि न्यू इंग्लिश स्कूल पाटपन्हाळे या स्कूलची विद्यार्थिनी कु. समृद्धी सुरेश आंबेकर हिने प्रचंड जिद्दीने,मेहनतीने आणि कष्टाने इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत ९९.२०% गुण मिळवत गुहागर तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला असून रत्नागिरी जिल्ह्यात तिच्या नावाची जोरदार चर्चा चालू आहे. अतिशय मेहनतीने समृद्धीने आई वडील आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे यश संपादन करीत गुहागरच्या शिक्षण क्षेत्राच्या क्षितिजावर एक आगळा वेगळा ठसा उमटवला आहे. वडील सुरेश आंबेकर हे शिक्षक असून त्यांना सामाजिक कार्याबरोबरच पत्रकारितेची आवड आहे. त्यांचा शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात आणि पत्रकारितेत नावलौकिक आहे. समृद्धीला लहानपणापासूनच आई-वडिलांनी अनेक स्पर्धा परीक्षेत उतरवण्यात मार्गदर्शन केले आणि त्याप्रमाणे समृद्धीने लहानपणापासूनच अनेक पारितोषिके मिळवली आहेत. विज्ञान प्रदर्शनातही तिने आपल्या ज्ञानाचा जोरावर यश संपादन केलेले आहे. समृद्धीला विविध सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी पुढील शिक्षणासाठी आणि वाटचालीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत. अतिशय प्रामाणिकपणे केलेल्या कष्टाची चीज झाल्याची प्रतिक्रिया समृद्धी सुरेश आंबेकर हिने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. आजोबा, आजी, आई-वडील आणि



शिक्षकांचे मार्गदर्शन आणि माझी मेहनत यामुळे मीहे यश संपादन केले आहे असेही समृद्धी सुरेश आंबेकर हिने आवर्जून सांगितले. न्यू इंग्लिश स्कूल पाटपन्हाळे या स्कूलचा इयत्ता १० वी परीक्षेच्या बोर्डाच्या निकालामध्ये टॉपरमध्ये कु. समृद्धी सुरेश आंबेकर तिने ९९.२०% गुण मिळवत गुहागर तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला असून मृण्मयी दत्ताराम जाधव हिने ९६.२०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला असून श्रद्धा अनिल धुमक हिने ९४.२०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सामाजिक ,धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातून अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

संपादकीय

# आवडते-नावडते विरोधक हा निरंतर खेळ

महाराष्ट्रात आवडते विरोधक व नावडते विरोधक याचा भेद समजून घ्यायचा असेल तर कोणत्या काळात कोणत्या विरोधी नेत्याला वेगवेगळ्या संस्था, उपक्रम स्थापन करता आले. त्यांच्या संस्थांना, उपक्रमांना सरकारी मदत सतत मिळत गेली, याचा मागोवा घेतला पाहिजे.

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आणि तामिळनाडूमध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम यांना विधानसभा निवडणुकीत सणसणीत पराभव स्वीकारावा लागल्यानंतर त्यांच्या आणि त्यांचे प्रमुख अनुक्रमे ममता बॅनर्जी व एम. के. स्टॅलिन यांच्या भवितव्यापुढे प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. महाराष्ट्रात मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विक्रमी मताधिक्क्यासह मिळालेल्या विजयामुळे हा प्रादेशिक पक्ष टिकणार हे निश्चित आहे.

राजकारणात आवडता विरोधक आणि नावडता विरोधक अशा दोन संकल्पना वरवर दिसत नसल्या तरी पडद्यामागे अस्तित्वात असतात. सत्ताधारी पक्षाच्या सोयीचा विरोधक आवडता आणि गैरसोयीचा तो नावडता असतो. पंजाबमध्ये मागील निवडणुकीत आम आदमी पार्टीन विधानसभा जिंकली ती अशाच संकल्पनेवर. तिथे काँग्रेसचा पाडाव करायला हा पक्ष कामाला आला. आता त्याची गरज संपत आली आहे. या आधी अकाली दल काँग्रेसला सतत आव्हान देत होता तेव्हा त्याचे सर्व नखरे सहन करत भाजपा त्यांच्या सोबत युतीत होता.

तमिळनाडूमध्ये द्रमुकला पराजित करण्याची धमक एका सिनेनायकातच असू शकते यावर आधारित काम झाले. एकाचवेळी शहरी आणि ग्रामीण भागात सर्व समाजघटकातील बहुतेक मतदारांनी तमिळगा वेत्री कळघम (टीव्हिके) या पक्षाच्या पाठीशी उभे राहणे उगाच घडत नसते. तमिळनाडूत विजय या अभिनेत्याने गेल्या काही वर्षांत जे सिनेमे केले त्यातील बरीच कथानके सरकारी व्यवस्थेच्या विरोधात दिलेल्या लढ्याची होती. त्याचा योग्य तो संदेश लोकांमध्ये पोहचत असताना द्रमुकच्या विरोधकांकडून त्याला हवा देण्याचे प्रयत्न झालेच नसेल, असे म्हणणे कठीण आहे.

महाराष्ट्राच्या मातीत राजकीय कथानके वेगळ्या अर्थाने आकाराला येत असतात. शिवसेनेच्या स्थापनेनंतर काही वर्षांतच या पक्षाला उपहासाने वसंतसेना म्हटले जाऊ लागले होते. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक पडद्याआडून सेनेला बळ देतात असा आरोप तेव्हाचे विरोधक डावे पक्ष, प्रजा समाजवादी, शेका पक्ष करत असत. मुंबईवर खऱ्या अर्थान राज्य केले ते कामगारांनीच. त्यांचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांनी काँग्रेसला हैराण करून टाकले होते. तेव्हा शिवसेनेने त्या वर्चस्वाला सुरुंग लावला. अर्थात याला अनेक बाजू असल्या तरी श्लेष असाच आहे.

महाराष्ट्रासारख्या साधनसंपत्तीने श्रीमंत राज्यावर आपली एकमुखी सत्ता असावी असे काँग्रेस व भाजपा या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना वाटणे अनैसर्गिक नाही. पण एकीकडे शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा गड मजबूत बांधला आणि काँग्रेससमोर आघाडी करण्याशिवाय पर्याय उरला नाही. तेव्हा राष्ट्रवादीला शह देण्यासाठी विरोधी बाकावरील काही नेत्यांचा खुबीने वापर करून घेण्यात आला. त्यामुळे विरोधकातच दोन गट पडले होते. हे राजकारण काँग्रेसचे मुख्यमंत्री चतुराईने खेळत राहिले. जेव्हा नारायण राणे अस्वस्थ होऊन बाहेर पडले तेव्हा काँग्रेस नेतृत्वाने त्यांना पक्षात खेचले. पुढे राज ठाकरे नाराज होऊन बाहेर पडले व स्वतंत्र पक्ष काढला तेव्हा आंदोलन, अटक या प्रकरणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची हवा तयार झाली. २००९ च्या निवडणुकीत त्याचा अचूक लाभ काँग्रेस राष्ट्रवादीने सत्ता टिकविण्यासाठी घेतला.

महाराष्ट्रात आवडते विरोधक व नावडते विरोधक याचा भेद समजून घ्यायचा असेल तर कोणत्या काळात कोणत्या विरोधी नेत्याला वेगवेगळ्या

संस्था, उपक्रम स्थापन करता आले. त्यांच्या संस्थांना, उपक्रमांना सरकारी मदत सतत मिळत गेली. कधी चौकशीचा ससेमिरा मागे लागला नाही, तसेच त्यांच्या मतदारसंघात त्यांना व्यक्तिगत कधी त्रास झाला नाही, याचा मागोवा घेतला की हे सहज लक्षात येते.नवा दिवस नवे आडाखे या प्रमाणे राजकारण फिरता फिरता ते २०१० च्या आणि २०२० च्या दशकात येते. राज्यात मराठा मतदान बऱ्यापैकी संघटीतपणे होत असते आणि ते सहकारी संस्थांच्या भोवती फिरते.

# ज्ञानदीप भडगावचा अनुराग वाघमोडे १०० % गुणांसह राज्यात पहिला सलग २५ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम

खेड - दि. ०८ मे, ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ,खेड (रत्नागिरी) या शैक्षणिक संस्थेच्या कै. प्रभाकर गजानन कांबळे ज्ञानदीप विद्या मंदिर,

भडगाव या प्रशालेतील अनुराग महादेव वाघमोडे याने १०० % गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे. तर वृषभ दिगंबर देवघरकर ९९.६० % गुण मिळवून राज्यात तृतीय, दिशा दिलीप मोहिते ९९.४० % गुण मिळवून राज्यात चौथी आली आहे. आर्यन बाळासाहेब भगत ९८.८०% गुण मिळवून प्रशालेत चौथा तर शिवराज राजेश सूर्यवंशी ९८.४० % गुण मिळवून प्रशालेत पाचवा आला आहे. ४६ विद्यार्थ्यांपैकी २८ विद्यार्थ्यांनी ९०.०० % पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. वर्गातील सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणी प्राप्त करून उत्तीर्ण झाले आहेत.ङ्ग



1st - Anurag Mahadev Waghmode 100 % | 2nd - Vrushabh Digambar Deogharkar - 99.60 % | 3rd - Disha Dilip Mohite 99.40 % | 4th - Aryan Balasaheb Bhagat 98.80% | 5th - Shivraj Rajesh Suryawanshi - 98.40

विषयातील प्रथम विद्यार्थी ङ्गमराठी विषयात प्रथम - वेदा दिनेश शिरीषकर - ९९ गुण, संस्कृत विषयात प्रथम - अनुराग महादेव वाघमोडे, वेदा दिनेश शिरीषकर, विश्वश्री रोहिदास केंद्रे, आर्या गजेंद्र बेंद्रे - १०० गुण, इंग्रजी विषयात प्रथम - अनुराग महादेव वाघमोडे - ९८ गुण, गणित विषयात प्रथम - वृषभ दिगंबर देवघरकर, दिशा दिलीप मोहिते, आर्य योगेश चिले, इंद्र संदेश पाटणे - १०० गुण, विज्ञान विषयात प्रथम - अनुराग महादेव वाघमोडे - १०० गुण , समाजशास्त्र विषयात प्रथम - अनुराग महादेव वाघमोडे - १०० गुणङ्ग या विद्यार्थ्यांना संस्थेचे सल्लागार व पुणे येथील तज्ज्ञ मार्गदर्शक श्रीरंग बापट, मुख्याध्यापक राजकुमार मगदूम, पर्यवेक्षक संतोष भोसले,

वर्गशिक्षक रागिणी जामकर, सुनील यादव, दिलीप मोहिते, विनोद टेंबे, महादेव वाघमोडे, संदेश जाधव, शांतीलाल आव्हाड, रामचंद्र भिंगारे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरविंद तोडकरी, उपाध्यक्ष डॉ. रमणलाल तलाठी, सरचिटणीस माधव पेठे, खजिनदार विनोद बेंडखळे, विश्वस्त व जनसंपर्क अधिकारी दीपक लढढा, विश्वस्त पेराज जोयसर, भालचंद्र कांबळे, संस्थापक सरचिटणीस प्रकाश गुजराथी, संस्थापक सदस्य चंदन पाटणे, प्रफुल्ल महाजन, अनिल शिवदे, संस्था सदस्य रुपल पाटणे व सल्लागार मंडळ सदस्य, ज्ञानदीप परिवारातील सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# राजापुरात मान्सूनपूर्व पावसाची जोरदार एंट्री आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान

राजापूर ०८:- राजापूर शहरासह तालुक्यात आज ८ मे शुक्रवार रोजी सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. ङ्ग सायंकाळी साडेसहाच्या सुमारास अचानक काळ्याकुट्ट ढगांनी आकाश व्यापले आणि जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. या अचानक आलेल्या पावसामुळे नागरिक, व्यापारी तसेच शेतकरी वर्गाची मोठी तारांबळ उडाली.ङ्गदुपारपासूनच वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल जाणवत होता. उष्णतेची तीव्रता वाढली होती. सायंकाळी पाचनंतर ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि त्यानंतर काही वेळातच वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. राजापूर शहर परिसरासह तालुक्यातील विविध भागांत पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या.ङ्गया अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका आंबा बागायतदारांना बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी आंब्यांची मोठ्या प्रमाणात गळती झाली असून बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले आहे. हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात असताना झालेल्या या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.ङ्गदरम्यान, हवामान विभागाने रत्नागिरी जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी केला असून ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून विजांच्या कडकडाटावेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे.ङ्गराजापूर बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची तसेच व्यापाऱ्यांचीही या अचानक आलेल्या पावसामुळे मोठी धावपळ उडाली. काही ठिकाणी वाऱ्यामुळे फलक व तात्पुरत्या शेड्स हलल्याचेही दिसून आले.




# श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात आज देऊळ बंद - २ चित्रपट टिझरचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते अनावरण

श्रीशैल गवंडी, अ.कोट

सुमारे दहा वर्षांपुर्वी झालेले व श्री स्वामी समर्थांच्या अवतार कार्यावर आधारीत दिग्दर्शक प्रविण तरडे निर्मीत देऊळ बंद या मराठी चित्रपटास राज्यातील तमाम स्वामी भक्तांसह सर्वांनीच उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्यानंतर दिग्दर्शक प्रविण तरडे यांनी मोठ्या भक्तीभावात देऊळ बंद २ या चित्रपटाची निर्मिती केली आहे. आज या देऊळ बंद २ या मराठी चित्रपटाच्या टिझरचा अनावरण सोहळा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. हा सोहळा देऊळ बंद - २ चित्रपटाचे दिग्दर्शक - अभिनेते प्रविण तरडे, अभिनेत्री स्नेहल तरडे, जेष्ठ अभिनेते स्वामी समर्थ फेम मोहन जोशी, निर्माते कैलाश वाणी, जयश्री वाणी, कैवल्य वाणी, जुईली वाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते ऑनस्क्रीन बटन दाबून टिझरचा अनावरण सोहळा मोठया भक्तीभावात संपन्न झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून २१ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शीत होणारा हा देऊळ बंद २ हा मराठी चित्रपट स्वामी भक्तांनी जरूर पहावा असे आवाहन केले. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे,

विश्वस्त महेश गोगी, मंदार महाराज पुजारी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, कोरिओग्राफर



नंदकुमार जाधव, कुणाल मांजरेकर, चैतन्य दळवी, प्रद्युम्न जोशी, अभियंता नवनाथ बनकर, सुनिल नाईकवडी, सागर गोंडाळ, रमेश शिंदे,

विपूल जाधव, श्रीकांत मलवे, सुनिल पवार, ओंकार महाडीक, अविनाश क्षीरसागर आदींसह देऊळ बंद २ चित्रपट संपूर्ण टीमसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थांची भुमिका साकारल्यामुळे माझ्या अंगी असलेला अष्टपैलू अभिनेता समाज व स्वामी भक्तांनी पाहिला आहे. मुळातच मी स्वामी भक्त असल्याने स्वामींची व्यक्तीरेखा साकारणं हे माझ्यासाठी खुप मोठं आशिर्वाद आहे. देऊळ बंद २ या चित्रपटात शेतकरी कुटूंबानं घेतलेली देवाची परिक्षा हा अद्भुत प्रसंगावर विषय हाताळण्यात आला आहे जो स्वामी भक्तांना नक्कीच भावेल म्हणून सर्व स्वामी भक्तांनी हा चित्रपट प्रदर्शीत झाल्यानंतर नक्कीच पहावा - जेष्ठ अभिनेते मोहन जोशी - मुंबई,

श्री.स्वामी समर्थ फेम, देऊळ बंद

..........................................................

प्रविण तरडे सारख्या नास्तिक माणसाला स्वामींनी भक्तीमार्ग दाखवून त्याचे जीवन व संसार उभे केले आहे, म्हणून स्वामी भक्तानी व नागरिकांनी आपल्या कष्टा सोबत नियमीतपणे स्वामींचे नाम घ्यावे बाकी आपल्या जीवनाचे कल्याण करण्यास स्वामी समर्थ आहेतच. देऊळ बंद या शिर्षकावर स्वामींच्या विविध भक्तीमार्गावर आपण भविष्यात एकूण ११ भाग प्रदर्शीत करण्याचा निर्णय घेतला आहे त्याला स्वामी यश देतीलच, त्यापैकी आता देऊळ बंद २ प्रदर्शीत होत आहे, त्याला स्वामी भक्त निश्चीतच दाद देतील - प्रविण तरडे - पुणे, दिग्दर्शक देऊळ बंद - जवळपास दहा वर्षांपुर्वी दिग्दर्शक प्रविण तरडे यांच्या कडून सुरुवातीला चित्रपटाचे देऊळ बंद हे नाव ऐकून मला खुप आश्चर्य वाटले, परंतू त्यांनी नंतर कथेचा मुख्य गाभा समजावून सांगीतला. मग आम्ही चित्रपटाच्या चित्रीकरणास संमती दिली होती. म्हणजे थोडक्यात नास्तिक माणूस देवाचं देऊळ बंद करायला निघतो म्हणून देऊळ बंद हे शिर्षक देण्यात आलं आहे.

देऊळ बंद १ मध्ये स्वामी समर्थ प्रत्यक्षात वैज्ञानिका समोर येतात आणि त्याचीच परीक्षा घेतात. शेवटी तोच शास्त्रज्ञ स्वामींच्या चरणी नतमस्तक होतो. आता

देऊळ बंद २ या दुसऱ्या भागात टॅगलाइन आहे आता परीक्षा देवाची पहिल्या भागात भक्ताची परीक्षा होती, आता देवाची परीक्षा आहे. पोस्टरमध्ये पण स्वामी प्रसन्न आहेत पण भक्त रागात आहे.थोडक्यात देऊळ बंद हे नाव श्रद्धा विरुध्द अश्रद्धा या संघर्षाचं प्रतीक आहे. देव नाकारणारा माणूस शेवटी देवाला शरण जातो हीच सिनेमाची थीम आहे. प्रविण तरडेंनी खूप विचार करून हे नाव दिलंय. प्रविण तरडे यांच्यावर श्री स्वामी समर्थाची नक्कीच कृपा आहे, म्हणूनच त्यांच्या चित्रपट सेवेला स्वामींनी भरभरुन यश व समृध्दी दिली आहे असेच यश देऊळ बंद २ या चित्रपटालाही स्वामी नक्कीच देतील असा विश्वास व्यक्त करतो व माझ्या कडून तसेच देवस्थानचे सर्व विश्वस्त पदाधिकारी व मित्रमंडळी कडून आज संपन्न झालेल्या देऊळ बंद २ या चित्रपटाच्या टीझर अनावरण सोहळ्यास व चित्रपटाच्या प्रदर्शनास शुभेच्छा व्यक्त करतो. ।। श्री स्वामी समर्थ।। - श्री.महेश क.इंगळे - चेअरमन श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट/ मा.नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक, नगर परिषद, अक्कलकोट)

# चंद्रकांत बाईत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आबलोली दहावीचा निकाल ९५.५५ टक्के

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील आबलोली येथील चंद्रकांत बाईत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल ९५.५५% लागला असून इयत्ता १० च्या परीक्षेसाठी एकूण ४५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कुमारी पद्मश्री प्रसन्न वैद्य हिने ८८.८० % गुण मिळवून आबलोली विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कुमारी गार्गी उल्हास काळे हिने ८६.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे तर कुमारी अनुष्का शिवाजी भोसले हिने ८६.००% गुण मिळवून तसेच कुमार साईराज शेखर अलीम याने ८६.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या परीक्षेसाठी ङ्गएकूण ४५ विद्यार्थी बसले होते पैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. चंद्रकांत बाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आबलोली या विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९५.५५% लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक धनाजी गिरी, लोक शिक्षण मंडळ आबलोली या मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांतशेठ बाईत, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिनशेठ बाईत आणि संचालक मंडळाच्या सर्व सदस्य, पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# एक्सलंट अकॅडमी इंग्लिश मीडियम स्कूल आबलोली या स्कूलचा १० वीचा निकाल १००%

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील एक्सलंट अकॅडमी इंग्लिश मीडियम स्कूल आबलोली या स्कूलचा इयत्ता १० वीचा निकाल १००% लागला आहे.

इयत्ता १० वीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी एकूण ७ विद्यार्थी बसले होते. हे ७ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. कुमारी शर्वरी श्याम पवार हिने ८२.८० गुण मिळवून स्कूलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कुमार कार्तिक सुनील मोहित याने ६९.४०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे तर कुमारी फरीना वसीम कुरेशी हिने ६५.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे आणि त्यांच्या पालकांचे चंद्रकला फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष सचिनशेठ बाईत, सेक्रेटरी सौ. स्नेहल बाईत, स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. नेत्रा रहाटे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत



# नॅशनल हायस्कूल दापोली चा निकाल शंभर टक्के

दापोली ०८:- मुस्लिम एज्युकेशन सोसायटी संचलित नॅशनल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज दापोली चा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून प्रशालेने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. परीक्षेत प्रशालेतील सर्वच्या सर्व म्हणजे ७८विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.



प्रशालेतून कु.जिया जमीर जमादार हिने ९४.८० टक्के गुण घेत प्रथम क्रमांक, कु.शिफा जमीर चिपळूणकर ९१.६० टक्के गुण घेत द्वितीय क्रमांक, कु . नौफ शौकत कोंडविलकर हिने ८८.२० टक्के गुण घेत तृतीय क्रमांक पटकावला. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थी विशेष प्राविण्या सह, २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व एक विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झालेला आहे.

या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नजीर पठाण, गव्हर्निंग बॉडी चेअरमन लियाकत रखांगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जावेद मणियार, सचिव इकबाल परकार, कॉलेज कमिटी चे अध्यक्ष आरिफ मेमन, संस्थेच्या सर्व सदस्यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे तसेच मुख्याध्यापक अय्युब मुल्ला सह प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# ज्ञानदीप विद्यामंदिर दापोली इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत १००% यशाची परपंरा कायम

दापोली ०८:- ज्ञानदीप दापोली संचलित ज्ञानदीप विद्यामंदिर दापोली या प्रशालेचा एस. एस.सी परीक्षा मार्च २०२६ चा निकाल १०० % लागला असून प्रशालेची १००% यशाची परंपरा कायम राखली आहे.ङ्ग शाळेमध्ये नित्या रवींद्र गायकर हिने ९९.००% गुण मिळवून प्रथम क्रमांक, जान्हवी मोरे ९४.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर अथर्व पांडुरंग इंदलकर याने ९३% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच विशेष प्रावीण्य ४१,प्रथम श्रेणी १४,द्वितीय श्रेणी ११,उत्तीर्ण २ असे एकूण ६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेंत याबद्दल संस्था अध्यक्षा सरोज मेहता, सेक्रेटरी सुजय मेहता ,

संस्था संचालक हसमुख जैन, विश्वास काका कदम, रवींद्र कालेकर, सुयोग मेहता, संकेत मेहता, सुहासिनी कोपरकर व सर्व मेहता परिवार आदि,संस्था पदाधिकारी प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर मोरे, शिक्षक प्रतिनिधी सोपान.चौगुले शिक्षकेतर प्रतिनिधी सचिन इदाते व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक व सहकार्य करणारे सर्व हितचिंतकांचे हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.




# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

शालेय विद्यार्थ्यांसाठी आता विज्ञानवारी

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची गोडी लागावी,प्रयोगातून विज्ञान शिकण्याची सवय लागावी,आणि विज्ञान हा विषय केवळ शालेय पुस्तकापुरता मर्यादित नाही हे विद्यार्थ्यांना उमगावे यासाठी नव्या शैक्षणिक वर्षांपासून राज्यात मुख्यमंत्री विज्ञानवारी हा महत्वाकांक्षी उपक्रम सुरु होणार आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यां थेट नासा आणि इसरो सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांपर्यंत पोहचण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच विज्ञानाच्या नव्या क्षितिजाची ओळख करून देणाऱ्या या अभिनव उपक्रमाच्या अनुषंगाने राज्याचे शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.



१राज्यात राबविला जाणारा मुख्यमंत्री विज्ञानवारी हा उपक्रम नेमका काय असणार आहे?

राज्यात दरवर्षी होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनांना आता विज्ञान वारीची जोड मिळणार आहे. तालुका,जिल्हा आणि राज्य स्तरातून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना विज्ञान अनुभवण्याची संधी दिली जाणार आहे. यामुळे स्पर्धा आणि अनुभव या दोन्ही गोष्टींचा संगम साधत विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या उपक्रमांतरागत तालुका स्तरावर अव्वल ठरलेल्या सुमारे २ हजार १४८ विद्यार्थ्यांना राज्यातील विविध सायन्स सेन्टर्सना भेट देण्याची संधी मिळेल. त्यानंतर जिल्हा स्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इसरो केंद्र पाहत येईल. आणि राज्यातील चमकदार कामगिरी करणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेची वारी करून नासा केंद्राला भेट देण्याची मोठी संधी मिळणार आहे.

२ या उपक्रमाचा उद्देश नेमका काय आहे?

राष्ट्रीय शिक्षण २०२०च्या पार्श्वभूमीवर विज्ञानवारी हा उपक्रम राज्यातील शाळामध्ये राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. डिजिटल साधने,कृत्रिम प्रज्ञा आणि प्रयोगाधारित शिक्षणाच्या माध्यमातून शिकणे अधिक रंजक आणि अनुभवाधारित करणायचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

३इसरो आणि नासाच्या दौऱ्याचा खर्च कोण करणार आहे?

राज्यस्तररावरील विजेत्यांसाठी नासाची आठ दिवसांची भेट आयोजित करण्यात येणार असून या दौऱ्यातील विमान प्रवास,व्हिसा ,निवास आणि स्थानिक प्रवासाचा संपूर्ण खर्च सरकारकडून उचलला जाणार आहे. या दौऱ्यासाठी सुमारे ३. ३ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्रामीण आदिवासी आणि इतर भागातील विद्यार्थ्यांना देखील जागतिक स्तरावरील विज्ञानवारीचा अनुभव घेता येणार आहे.

२ चला पर्यटनाला

वर्ध्यातील सेवाग्राम आणि पवनार

महाराष्ट्रातील विदर्भातील वर्धा हा जिल्हा देशाच्या दोन महान सुपुत्रामुळे पावन असा जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वधर्गीय जमनलाल बजाज यांच्या् विनंतीवरुन सन १९३६ साली महात्मां गांधी वर्ध्याला आले. त्यांनी आश्रम तत्कानलीन सेगावात करण्याचे निश्चित केले. सेवाग्राम आश्रमातूनच देशाची स्वा्तंत्र संग्राम चळवळ पूर्णअर्थाने सुरु होती. आजही गांधीजींचे उपयोगातील साहित्य सेवाग्राम येथील आश्रमात पाहावयास मिळते. आश्रमाच्या परिसरातच आदी निवास, बापू कुटी, ‘बा’कुटी, आखरी निवास, महादेव कुटी, किशोर कुटी आदी ऐतिहासिक ठेवा जपण्याात आलेला आहे. या सर्वांची देखरेख आश्रम ट्रस्टि करत असते. सेवाग्राम आश्रमाच्या बाजूलाच गांधीजींच्याय जीवनावर आधारीत चित्रप्रदर्शनी आहे. तसेच भारत सरकारच्या पर्यटन आणि विकास खात्यांतर्गत पर्यटकांसाठी आश्रमाच्यार परिसरातच यात्रेकरूंसाठी निवासाची सोयही आहे. महात्मा गांधींच्या स्मरणार्थ सन १९४४ साली कस्तुरबा रुग्णायलयाची स्थाकपनाही सेवाग्राम येथे करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर डॉ. सुशीला नायर यांनी सन १९६९ साली महात्माग गांधी वैद्यकीय महाविद्यालय सेवाग्राम येथे सुरु केलेले आहे.

वर्ध्याचपासून पाच मैलाच्या अंतरावर धाम नदी काठावर पवनार हे गाव आहे. याठिकाणी आचार्य विनोबा भावेंनी १९३४ साली परमधाम आश्रमाची स्थावपना केली. स्वोशांती, ब्रम्हामच्याच शोधात निघालेल्या विनोबाजींवर महात्माऊ गांधीजींच्यार विचारांचा प्रभाव पडला. त्यायमुळे त्यां नी अंतर्मनाचा ठाव लक्षात घेऊन पदयात्रा, भूदान चळवळ राबविली. तसेच येथूनच भारत छोडो आंदोलनाचे नेतृत्व्? केले. आणखीन एक वैशिष्टतय म्हचणजे महात्माद गांधीजींच्या अस्थीचे या धाम नदीतच विसर्जन करण्याणत आले होते.

३ नोंद

स्विगी रेस्टॉरंट अवॉर्ड्स २०२६:ची घोषणा

भारतातील अग्रेसर ऑन-डिमांड सोयीस्कर प्लॅटफॉर्म असलेल्या स्विगीने त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या देशव्यापी आवृत्तीचा भाग म्हणून स्विगी रेस्टॉरंट अवॉर्ड्स २०२६ च्या मुंबईतील विजेत्यांची घोषणा केली. या पुरस्कारांसाठी ६.४३ लाख युनिक युजर्सकडून १.३ कोटींहून अधिक अभूतपूर्व मते मिळाली, ज्यामुळे कंपनीने मागील वर्षाच्या तुलनेत २.२ पट मोठी झेप घेतली आहे, यामुळे ही आजवरची सर्वात मोठी आवृत्ती ठरली आहे. १६० हून अधिक शहरे, ११० श्रेणी आणि १५,००० विजेते ब्रँड्स यांमध्ये विस्तारलेल्या या वर्षीच्या पुरस्कारांनी फूड डिलिव्हरी आणि हॉटेलमधील जेवणाच्या अनुभवांमधील सर्वोत्तम कामगिरीचा गौरव केला. मतदानाच्या लिंक्स ४३.८ लाख युजर्सनी शेअर केल्यामुळे या सहभागाचा विस्तार वाढला, ज्यामध्ये प्लॅटफॉर्मवर नवीन असलेल्या २५ युजर्सनी सहभाग नोंदवला. २०२६ च्या आवृत्तीत प्रादेशिक श्रेणी आणि शहरांनुसार मिळणाऱ्या प्रतिसादाद्वारे अधिक सखोल सुसंगतता दिसून आली, तसेच दिल्लीसारख्या उच्च सहभाग असलेल्या बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करून शहरांची निवड अधिक सुव्यवस्थित करण्यात आली. मुंबईत, फूड डिलिव्हरी आणि हॉटेलमधील जेवणाच्या श्रेणींमधील लोकल लेजेंड्सने शहराच्या वैविध्यपूर्ण आणि विकसित होत असलेल्या खाद्यपदार्थांच्या आवडीनिवडींचे प्रतिबिंब उमटवले. फूड डिलिव्हरीमध्ये बेहरोझ बिर्याणी, सँडविझ्झा मुंबईज्? बेस्ट सँडविच, बॉक्स८ देसी मील्स, झाझा मुघल बिर्याणी, थिओब्रोमा, आणि चारकोल ईट्स बिर्याणी अँड बियॉन्ड हे अव्वल विजेते ठरले असून, यामध्ये प्रतिष्ठित जुने ब्रँड्स आणि नवीन काळातील आवडत्या ब्रँड्सचे मिश्रण दिसून आले.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शनिवार, ०९ मे २०२६


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## चेंबूरमध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्यात नवजात अर्भकाचा मृतदेह सापडल्याने खळबळ

मुंबई (प्रतिनिधी): मुंबईतील चेंबूर परिसरातील नवजीवन सोसायटीजवळ कचऱ्याच्या ढिगाऱ्यात नवजात शिशूचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सकाळच्या सुमारास स्थानिक नागरिकांना कचऱ्यात संशयास्पद हालचाल दिसल्याने त्यांनी तत्काळ पोलिसांना



माहिती दिली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी पाहणी केली असता नवजात अर्भक मृत अवस्थेत आढळून आले.ङ्गया घटनेमुळे परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त केली जात असून, एवढ्या निर्दयीपणे नवजात बालकाला कचऱ्यात फेकून दिल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला असून, अर्भकाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू आहे.ङ्गदरम्यान, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे. या धक्कादायक घटनेमुळे चेंबूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९८.५७%

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रु-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेमध्ये मंडणगड तालुका

होते.त्यापैकी विशेष योग्यता श्रेणी २२, प्रथम श्रेणीत ६०, द्वितीय श्रेणीमध्ये ४२ व पास श्रेणीत१४विद्यार्थी उत्तीर्ण झाले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिकवणाऱ्या



विकास मंडळ संचलित,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर

हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रविष्ट नियमित विद्यार्थ्यांचा निकाल ९८.५७% लागला आहे.यामध्ये कैवल्य प्रशांत जोशी ९६.२०% गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला.तसेच द्वितीय क्र. श्वेता शिवप्रसाद हत्ते ९५.००%, तृतीय क्र. अलमास दिलू मुल्ला ९०.००%गुण मिळवून तृतीय येण्याचा मान मिळवला. विद्यालयातून दहावीला एकूण १३८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले

शिक्षकांचे,संस्थेचे अध्यक्ष कामगार नेते भाईसाहेब जगताप,कार्याध्यक्ष दिलीपदादा जगताप, सरचिटणीस ॲड. विनोदभाई दळवी,चिटणीस अभिजीत गांधी व संतोषजी मांढरे तसेच सर्व संस्था पदाधिकारी,महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब हुलगे,उपप्राचार्य अर्जुन हुल्लोळी,पर्यवेक्षक शांताराम बैकर,शिक्षक प्रतिनिधी राजकुमार सूर्यवंशी, बसवंत शिरगिरे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

## पोफळी परिसरात अवकाळी पावसाचा कहर; जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस, नागरिकांची तारांबळ

शिरगाव प्रतिनिधी

चिपळूण तालुक्यातील पोफळी परिसरात काल सायंकाळी सुमारे ४.३० वाजण्याच्या



सुमारास अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दिवसभर उकाड्याचे वातावरण असताना अचानक आकाशात काळे ढग दाटून आले आणि काही वेळातच विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. यासोबतच जोरदार वारे वाहू लागल्याने अनेक ठिकाणी नागरिकांची धावपळ उडाली. अचानक बदललेल्या हवामानामुळे बाजारपेठ, रस्ते तसेच ग्रामीण भागातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले.ङ्गपावसाचा जोर इतका होता की काही मिनिटांतच रस्त्यांवर पाणी साचले. बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी दुकानांमध्ये आश्रय घेतला, तर अनेक दुचाकीस्वारांनी सुरक्षित जागा शोधून वाहने थांबवली. जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. त्यामुळे वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. काही भागात वीजपुरवठाही खंडित झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.ङ्ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये या अवकाळी पावसामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या आंबा, काजू, भाजीपाला तसेच इतर हंगामी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पिके काढणीसाठी तयार ठेवली होती, मात्र अचानक आलेल्या पावसामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेषतः फळबागांमध्ये गळती वाढण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.ङ्गदरम्यान, हवामानातील अचानक बदलामुळे परिसरात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनी उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाल्याचे सांगितले. मात्र अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे नागरिकांनी प्रशासनाकडे योग्य उपाययोजनांची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन.

## धडाकेबाज लेडी सुपरकॉप मीरा बोरवणकर आता राज्य महिला आयोगाच्या सारथी

पनवेल प्रतिनिधी-

सुनील जाधव

नवी मुंबई,राज्यातील महिलांच्या समस्यांना न्याय देण्यासाठी आणि महिला आयोगाला अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे.आपल्या धाडसी कार्यशैलीमुळे लेडी सुपरकॉप म्हणुन ओळखल्या जाणा-या निव्रुत पोलिस अधिकारी श्रीमती मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यांत आली आहे.बोरवणकर या १९८१ च्या बॅचच्या अधिकारी असुन महाराष्ट्र केडरच्या महिला आयपीएस अधिकारी होण्याचा मान त्यांना मिळाला आहे.पुण्याच्या आयुक्त आणि तुरुंग महानिरीक्षक या सारख्या महत्वाच्या पदांवर त्यांनी काम केलेले आहे.जळगाव सेक्स स्कँडलचा पर्दाफाश आणि अंडरवर्ल्ड विरोधातील त्यांची कारवाई विशेषरुपात गाजली होती.रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त होते.राज्यांत महिलांविरुध्द वाढणा-या गुन्ह्यांच्या पार्श्वभुमीवर बोरवणकर यांच्या सारख्या शिस्तप्रिय अधिका-याच्या नियुक्तीमुळे महिलांच्या हक्कांचे सरक्षंण आणि सक्षमीकरण या प्रक्रियेला गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## दापोली तालुक्याचा दहावीचा निकाल ९७.२६ टक्के; ४६ पैकी ३० शाळांचा शंभर टक्के निकाल

दापोली (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर झाला असून, कोकण विभागाने ९७.६२ टक्के निकालासह राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. दापोली तालुक्यानेही यंदा उल्लेखनीय कामगिरी करत ९७.२६ टक्के निकालाची नोंद केली आहे.ङ्गतालुक्यातून १७५४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १७५२ विद्यार्थी परीक्षेला बसले असून १७०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यात ३५९, प्रथम श्रेणीत ६३१, द्वितीय श्रेणीत ५५७ तर तृतीय श्रेणीत १५७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.ङ्गतालुक्यातील ४६ पैकी तब्बल ३० शाळांनी शंभर टक्के निकाल मिळवत गुणवत्तेची परंपरा कायम राखली. यामध्ये नॅशनल हायस्कूल दापोली, एम. के. इंग्लिश स्कूल आंजर्ले, एन. के. वराडकर हायस्कूल मुरूड, अंजुमन खैरुल इस्लाम उर्दू हायस्कूल दाभोळ, कुटरेकर विद्यालय पंचनदी, द रायझिंग हायस्कूल जामगे, गोविंदराव गुलाबराव दळवी हायस्कूल वेळवी, आनंदी गोपाळ महाजन विद्यामंदिर कोळथरे, लोकमान्य टिळक विद्यामंदिर




चिखलगाव, नॅशनल हायस्कूल हर्णे, न्यू इंग्लिश स्कूल करंजाळी-फणसू, सरस्वती माध्यमिक विद्यालय ओणणवसे, कै. पद्मश्री एस. एम. टाटा अण्णासाहेब बेहेरे विद्यालय आडे, विद्यामंदिर हायस्कूल उन्हवरे, न्यू इंग्लिश स्कूल मांदिवली, वेळवी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय, विरेश्वर विद्यालय विरसई, यु. ए. दळवी इंग्लिश मिडीयम हायस्कूल दापोली, सारंग पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय, ज्ञानदीप विद्यामंदिर दापोली, नॅशनल हायस्कूल मांदिवली, व्ही. के. जोशी हायस्कूल करंजगाव, जे. एम. पी. एस. फातिमा एच. अंतुले इंग्लिश स्कूल पांगारी, न्यू इंग्लिश स्कूल टाळसुरे, एल. के. जे. ऊर्फेभाई जावकर विद्यामंदिर तेरेवायंगणी, न्यू इंग्लिश स्कूल दमामे, न्यू इंग्लिश स्कूल कोळबांद्रे, इंग्लिश मिडीयम स्कूल दाभोळ, ए. मजित ए. बुरोंडकर हायस्कूल दापोली आणि डीईएस कौसर हसन इंग्लिश मिडीयम स्कूल दाभोळ यांचा समावेश आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )